# THE BOOK WAS DRENCHED

# थिऑसफींत नवीन काय आहे ?

( दोन जिज्ञासूंचा संवाद )

लेखक :

**वासुदेव लक्ष्मण चिपळूणकर,**

निवृत्तव्यवसाय वकील–अकोला ( वऱ्हाड ), हल्लीं मुक्काम

" हिरॅक्लिज् होम ", डे. जि., पुणें ४.

व

**राजाराम सखाराम भागवत ( ठाणें )**

ओं

THERE IS NO RELIGION HIGHER THAN TRUTH

प्रकाशक :

**घुनाथ भडभडे,** चिटणीस, मराठी थिऑसॉफिकल

रेशन, १८ गणेशवाडी, डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुद्रक :

**केशव गणेश शारंगपाणी,** आर्यभूषण मुद्रणालय,

९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४.

**१९५३**

**किंमत चार आणे**

UNIVERSAL LIBRARY
OU_196100
UNIVERSAL LIBRARY

OUP—391—29-4-72—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M212.5 C53T  Accession No. M1957

Author चिपळुणकर, वा. ल.

Title थिऑसफीत नवीन काय आहे

This book should be returned on or before the date last marked below.

# *थिऑसफींत नवीन काय आहे ?

## ( दोन जिज्ञासूंचा संवाद )

**प्रश्न**—मला जी थिऑसफीची थोडीफार माहिती आहे तिच्यावरून पहातां थिऑसफीचीं तत्त्वें सारीं हिंदुधर्मांतून घेतलेलीं आहेत. ईश्वराचें अस्तित्व, कर्माचा सिद्धांत, पुनर्जन्माचा सिद्धांत वगैरे गोष्टी ज्या थिऑसफिस्ट लोक सांगतात त्या आमच्या हिंदुधर्मांतून उचललेल्या उघड दिसतात. तेव्हां आम्ही हिंदुधर्मीयांनीं थिऑसफींत कां शिरावें ? आमच्या ऋषिमुनींनीं न सांगितलेल्या अशा कोणत्या गोष्टी थिऑसफींत आहेत कीं ज्यासाठीं आम्ही थिऑसफीकडे वळावें ? तुम्ही थिऑसफिस्ट लोकांनीं हिंदुधर्मांतल्या गोष्टी ( हव्या तर ) परकीय लोकांस शिकवाव्या, पण आम्हांला त्या कशाला सांगतां ? आम्हांला त्या बिलकूल नवीन नाहींत. आमची सख्खी आई सोडून थिऑसफीरूपी सावत्र आईचें दूध पिण्याची आम्हांला गरज काय ?

---

* पुणें येथें १९२४ सालीं वसंत व्याख्यानमालेमध्यें "थिऑसफी व अध्यात्म" या विषयावर दोन दिवस सार्वजनिक वाद झालेला होता. रावबहादुर भारताचार्य चिंतामणराव वैद्य हे अध्यक्ष होते. थिऑसफीची बाजू के. के. रा. छापखाने वकील, सांगली; के. प्रो. पंढरिनाथ काशीनाथ तेलंग ( बनारस ); व रा. वा. ल. चिपळूणकर, वकील, अकोला, यांनीं मांडली होती. विरुद्ध बाजू वे. शा. सं. श्रीधरशास्त्री पाठक, डेक्कन कॉलेज पुणें; श्री. ज. स. करंदीकर '( केसरी )' पुणें; व हिंगणे-महिला-विद्यापीठाचे प्रो. के. वामन मल्हार जोशी यांनीं मांडली होती. थिऑसफींत नवीन काय आहे ? हा मुद्दा त्या चर्चेत निघाल्यामुळें, दोन्ही पक्षांकडून त्यावर साधकबाधक चर्चा झाली. यासंबंधीची हकीकत "धर्म-जागृति" मासिकाच्या सन १९२४ च्या जूनच्या अंकांत पृ. १२४ ते १३५; १९२४ च्या सप्टेंबरच्या अंकाच्या पृ. २५८ ते २६८ वर आणि १९२४ च्या ऑक्टोबरच्या अंकाच्या पृ. २९८ ते ३०३ वर प्रसिद्ध झाली आहे. अजूनही हा प्रश्न अनेक विद्वानांकडून वारंवार विचारण्यांत येतो म्हणून या प्रश्नाची विस्तृत चर्चा या पुस्तिकेंत संवादरूपानें केली आहे.

**उत्तर**—थिऑसफींत कांहीं नवीन आहे का ? या प्रश्नाचें उत्तर मीं तुम्हांला क्षणभरानें देतों. पण तुम्हाला कांहीं नवीन हवें आहे का ? ओमार खलीफच्या आज्ञेनें अलेक्झँड्रिया शहरांतील एका प्रचंड लायब्ररींतले ग्रंथ अनेक शतकांपूर्वीं जाळून भस्मसात् करण्यांत आले असें कांहीं इतिहासकार सांगतात[1]. ती गोष्ट खरी असो वा नसो, ती उदाहरणादाखल घेण्यास अडचण नाहीं. त्या वेळीं ओमार खलीफ म्हणाला, " या लायब्ररींतील ग्रंथांत जें लिहिलेलें असणार तें कुराणाला धरून असणार किंवा कुराणापेक्षां वेगळें असणार. तिसरा पक्ष संभवत नाहीं. कुराणाला धरून तें असलें तर तें कुराणांत आहेच. तेव्हां या लायब्ररीची गरज नाहीं. कुराणापेक्षा वेगळें असलें तर तें कुराणाविरुद्ध अतएव असत्य असलें पाहिजे. तेव्हां असत्य शिकवणारे ग्रंथ समाजांत ठेवणें बरोबर नाहीं. एवीतेवीं ही लायब्ररी जाळून टाकण्यास हरकत नाहीं." तुम्ही याच विचारसरणीचा अवलंब करणार आहां का ? वेद हे हिंदुधर्माचे आकरग्रंथ आहेत. जें वेदांत आहे तेंच थिऑसफींत असलें तर आम्हांला त्याच्या पुनरुक्तीची आवश्यकता नाहीं. वेदांच्यापेक्षां निराळें असलें म्हणजे, विरुद्ध असलें तर तें चुकीचें असणार. तें अर्थात् आम्हांला नकोच नको. अशी तुमची विचारसरणी असली तर थिऑसफींत नवें काय आहे तें तुम्हांला सांगत बसण्यांत अर्थ नाहीं. तुम्हांला योग्य वाटत असलें तर ही विचारसरणी स्वीकारून तुम्ही थिऑसफीचा खुशाल इनकार करा; पण तीच विचारसरणी सर्वांस लागू करून तुम्हांला वारकरी पंथ, दासबोध, वगैरेंचाही इनकार केला पाहिजे. त्यांवर आक्षेप न घेतां आपण एकट्या थिऑसफीवरच आक्षेप घेणार असलां तर मी तुम्हांला प्रामाणिक म्हणणार नाहीं.

---

१ अबुलफरेजियस् यानें ही गोष्ट नमूद केलेली असून त्याबद्दलची अधिक माहिती Encyclopœdia Britannica खंड १ पृ. ४९४ ( आवृत्ति ९ ) यांत आहे.

**प्रश्न**—दासबोधांत एक वेगळी मांडणी असल्यामुळें मी वरील विचार-सरणी दासबोधाला लागू करीत नाहीं. हिंदुधर्मांत अशी वेगळी मांडणी करण्याची गरज पूर्वी अनेकवार उत्पन्न झालेली आहे.

**उत्तर**—थिऑसफींत ही एक वेगळी मांडणी आहे व म्हणूनच थिऑसफीलाही दासबोधाचा न्याय लागू केला पाहिजे. थिऑसफींत वेगळी मांडणी आहे व ती संशोधनात्मक व शास्त्रीय आहे. आजही अशा एका वेगळ्या मांडणीची आवश्यकता जगाला भासत आहे.

**प्रश्न**—संशोधनात्मक व शास्त्रीय मांडणी म्हणजे तुम्ही काय म्हणतां?

**उत्तर**—समजा, अगस्त्याच्या फुलांत मध असतो का? असा कोणी आपणांला प्रश्न विचारला, तर आपण अगस्त्याचीं पुष्कळ फुलें गोळा करूं आणि त्यांत मध आहे कीं नाहीं तें प्रत्यक्ष पाहूं. गुरूला उपग्रह आहेत कीं नाहींत असा प्रश्न पडला, तर दुर्बिणीनें गुरूचें निरीक्षण करून त्याचें उत्तर देऊं. एका लोहचुंबकाचा उत्तर ध्रुव दुसऱ्या लोहचुंबकाच्या उत्तर ध्रुवाला ओढतो कीं दक्षिण ध्रुवाला ओढतो असा प्रश्न पडला, तर दोन लोहचुंबक आणून खरें काय तें तपासून पाहूं. असल्या उद्योगांना भौतिक शास्त्रांत संशोधन म्हणतात. थिऑसफींत असलें संशोधन आहे. धर्माच्या क्षेत्रांतील आधुनिक चळवळींत बहुधा असलें संशोधन असत नाहीं. मृत्यूनंतर माणूस स्वर्गांत जातो कीं नरकांत जातो, असा प्रश्न निर्माण झाल्यास लोक गीता, उपनिषदें, गरुड पुराण, योगवासिष्ठ, दासबोध वगैरे ग्रंथ वाचतात, त्यांत या प्रश्नाबद्दल काय लिहिलें आहे त्याचा सुसंबद्ध असा अर्थ लाऊन त्या प्रश्नाचा निर्णय सांगतात. हें ग्रंथवाचन झालें, संशोधन नव्हे. मृत्यूनंतर माणूस कोठें जातो तें प्रत्यक्ष पहाणें हें संशोधन होय. असें संशोधन करतां येणें शक्य आहे. माणसाला राजयोगशास्त्राचा अभ्यास करून स्वतःच्या ज्ञानेंद्रियशक्ति कुशाग्र व सामर्थ्यवान् करतां येतात. या शक्तींना 'सिद्धि' म्हणतात. ज्यानें या सिद्धि प्राप्त करून घेतल्या आहेत त्याला मरणोत्तर स्थिति, पुनर्जन्माची

क्रिया वगैरे अतींद्रिय गोष्टी प्रत्यक्ष पहातां येतात. थिऑसफींत असलें संशोधन आहे. थिऑसफिकल सोसायटींतल्या कांहीं लायक पुढाऱ्यांनीं सिद्धि प्राप्त करून घेऊन व माणसाला अदृश्य असणाऱ्या पुष्कळ गोष्टींचें निरीक्षण व अवलोकन ( अर्थात् संशोधन ) करून ती माहिती जगासमोर ठेविलेली आहे. हिंदुधर्मांतही हे विषय आलेले आहेत. हिंदुधर्मांतल्या जुन्या काळच्या ऋषिमुनींनीं जें संशोधन केलें होतें त्यावर हिंदुधर्मांतली ही माहिती आधारलेली आहे. थिऑसफीनें हिंदुधर्मांतले सिद्धान्त घेतलेले आहेत असें म्हणणें गैरसमज करणारें आहे. थिऑसफीचें आधुनिक संशोधन व हिंदुधर्मांतील प्राचीन काळचें संशोधन हीं दोन्ही अनुभवात्मक असल्यामुळें हिंदुधर्माचे व थिऑसफीचे सिद्धान्त परस्परसदृश दिसत आहेत, अशी वस्तुस्थिति आहे. अतींद्रिय गोष्टींचें अशा प्रकारचें संशोधन थिऑसफीच्या क्षेत्रांत फार मोठ्या प्रमाणावर केलेलें असल्यामुळें थिऑसफीला धर्माची एक निराळी मांडणी करतां आलेली आहे.[1]

समजा एका माणसाला एका सुप्रसिद्ध बगीच्याचें वर्णन लिहावयाचें आहे. त्या बगीच्याची इतर लोकांनीं जीं पूर्वीच्या काळीं वर्णनें लिहिलेलीं असतील, तीं वर्णनें वाचून व निरनिराळ्या ग्रंथांत त्या बगीच्याबद्दलचे जे उल्लेख आलेले असतील ते पाहून व असल्या साधनांची जुळवाजुळव करून प्रस्तुत बगीच्याचें वर्णन लिहितां येईल; किंवा त्या बगीच्यांत पुनः पुनः फेऱ्या मारून, तेथील वृक्षवेलींचें, फुलाफळांचें, लतामंडपांचें बारकाईनें निरीक्षण करून लिहितां येईल. तत्त्वज्ञान, धर्म, अध्यात्मशास्त्र यांत इंद्रियातीत असलेल्या अनेक गोष्टी येतात. हिंदुधर्मांतल्या जुन्या ग्रंथांत

---

१ हें संशोधन कसें करतात त्याची माहिती लेडबीटरकृत Clairvoyance, जिनराजदास कृत Occult Investigations व डॉ. बेझंट–कृत The Investigations into the Super-physical ( Adyar Pamphlet No. 36 ) यांत आहे.

त्यांचीं वर्णनें आहेत. त्या वर्णनांची जुळवाजुळव करून अलीकडे लोक नवीन धर्मग्रंथ लिहीत असतात. थिऑसफींत तसें केलेलें नाहीं. अदृश्य-सृष्टीच्या बगीच्यांत फेऱ्या मारून जें प्रत्यक्ष दिसतें त्याची माहिती थिऑसफींत आहे. म्हणून थिऑसफीला एक नवीन मांडणी तयार करतां आलेली आहे. कोणत्याही विषयाची नवीन मांडणी करावयाची झाली तर ज्या गोष्टींचा खुलासा व जो तपशील जुन्या ग्रंथांत नाहीं, त्याचीही माहिती जरूर असते. आध्यात्मशास्त्र, धर्म, तत्त्वज्ञान यांचे जे उपलब्ध ग्रंथ आहेत ते जुन्या काळीं लिहिलेले आहेत. त्यांतील माहिती सामान्यतः अलंकारिक, काव्य-मय व गूढार्थक असते. तींत शास्त्रीय पद्धतीचा व स्पष्ट असा तपशील नसतो[1]. अलीकडच्या काळीं जिज्ञासू माणसासमोर एकादा विषय मांडावयाचा झाला, तर तो तपशील-वार रीतीनें मांडणें अवश्य असतें. तसेंच आज कित्येक नवीन प्रश्न उपस्थित झाले आहेत. अशा तपशीलवार मांडणीसाठीं व त्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यासाठीं नवीन माहितीची आवश्यकता आहे. थिऑसफीनें संशोधन करून ही नवीन माहिती मिळविलेली आहे, आणि त्या संशो-धनामुळेंच थिऑसफीला नवीन मांडणी करतां आलेली आहे. ही मांडणी तुम्ही आत्मसात् केलीत तर तुम्हांला आपला हिंदुधर्मही जास्त चांगल्या रीतीनें समजेल.

**प्रश्न**—अशी कोणती नवीन माहिती थिऑसफींत आहे ?

---

१. उदाहरणार्थ गरुडपुराणांत मरणोत्तर स्थितीचें वर्णन आहे. त्या स्थितींत वैतरणी नदी लागते, तींतून रक्त व पू हे वहात असतात ( पूयशोणित-वाहिनी ) व रक्तामांसांचा चिखल असतो ( मांसशोणितकर्दमा ) वगैरे अशास्त्रीय वर्णनें आहेत. माणसाला नरकाचें भय वाटावें म्हणून हीं वर्णनें भडक रंगविलीं आहेत. हल्लींच्या काळीं या भडक वर्णनांचा परिणाम असा होतो कीं, सुशिक्षित लोकांस त्या भाकड कथा वाटतात. त्यांच्या मागें जो सत्यांश आहे तो असल्या अशास्त्रीय व अतिशयोक्तीच्या वर्णनामुळें कोणाच्याही लक्षांत येत नाहीं. ( पहा गरुडपुराण सारोद्धार, अध्याय २ )

**उत्तर**—हिंदुधर्मांतल्या इतक्या मुद्यांबद्दल थिऑसफींत नवीन माहिती आहे कीं त्यांचें वर्णन करण्यास एक मोठा ग्रंथ लिहावा लागेल. उदाहरणार्थ माणसाचे पंचकोष, भुवर्लोक-स्वर्लोकादि सृष्टींतले अदृश्य लोक, मरणोत्तर स्थिति, माणसाचे पुनः पुनः होणारे जन्म, स्वप्न-सुषुप्ति-तुर्या वगैरे जाणीवेच्या पायऱ्या, राष्ट्रांचे उदयास्त, मानवकोटीची पूर्वकालीन व भावी उत्क्रांति, मानवी प्रगतीचा विहंगम मार्ग, जीवन्मुक्त पुरुष, जगाच्या योगक्षेमासाठीं त्यांनीं आंखलेल्या योजना, वगैरे कितीतरी गोष्टींबद्दलचें संशोधन करून नवीन माहिती मिळविलेली आहे व त्या सर्व गोष्टींची मांडणी आधुनिक कालास अनुसरून नव्या पद्धतीनें केलेली आहे.

**प्रश्न**—कांहीं उदाहरणें देऊन या संशोधनाचा व नव्या मांडणीचा खुलासा करतां का ?

**उत्तर**—माणसाला अनेक देह अथवा कोश असतात याची माहिती उपनिषदांत ( विशेषतः तैत्तिरीयोपनिषदांत ) दिलेली आहे. ही माहिती अगदीं तुटपुंजी आहे. ती इतकी थोडी आहे कीं, हे कोष खरोखरींच अस्तित्वांत आहेत कीं ती नुसती कल्पना आहे याचाच पंडितांमध्यें वाद आहे.[1] थिऑसफीमध्यें या कोषांचें पुष्कळ संशोधन करण्यांत आलेलें आहे. उदाहणार्थ वरील कोषांपैकीं ‘ मनोमय कोष ’ घेऊं. मनोमय

---

१. प्रो. आर. डी. रानडे यांनी मत दिलें आहे, कीं हे कोष खरोखरी अस्तित्वांत नसून त्या नुसत्या कल्पना आहेत. ( पहा, त्यांचें Constructive Survey of Upanishadic Philosophy पृ. १४१ ते १४४ ) हें मत बरोबर नाहीं. हे ‘ कोष ’ सिद्धी असलेल्या माणसाला दिसतात. थिऑसफीय संशोधकांनीं ते तपासून पाहिले आहेत. त्यांची सविस्तर माहिती थिऑसफीच्या अनेक पुस्तकांत व विशेषतः Man Visible & Invisible या पुस्तकांत सचित्र दिलेली आहे. इतर अनेक लोकांनींही ते कोष पाहिलेले आहेत. इतरांनीं दिलेली माहिती प्रस्तुत ग्रंथकाराच्या ‘ मृत्यू व मृत्यूनंतर ’ या पुस्तकाच्या ‘ मृत्यूच्या क्षणीं काय होतें ’ या नांवाच्या प्रकरणांत दिलेली आहे.

कोषाचे, समजण्याच्या सोयीकरतां, थिऑसफीय संशोधकांनीं वासनादेह ( astral body ) व मनोदेह ( mental body ) असे दोन विभाग पाडले आहेत. अनेक जिवंत व मृत माणसांच्या वासनादेह-मनोदेहांचें त्यांनीं योगसामर्थ्यानें तपशीलवार निरीक्षण केलेलें आहे. या कोषांचें ( देहांचें ) द्रव्य कोणत्या प्रकारचें असतें, तें सामान्य माणसाला कां दिसत नाहीं, त्यांची रचना कशी असते, निरनिराळया दर्जाच्या माणसांचे देह कसे दिसतात, त्यांत जे निरनिराळे रंग दिसतात ते कशाचे द्योतक असतात, माणसाच्या मनांत विचार व भावना आल्या, कीं त्याच्या ह्या कोषांत कोणती खळबळ होते, डोळा जसा पहाण्याकरितां व फुफ्फुस जसें रक्त शुद्ध करण्याकरितां असतें तसे हे देह कशाकरितां असतात, त्यांचा आकार केवढा असतो, मृत्यूनंतर हे कोष कोठें जातात वगैरे गोष्टींचें संशोधन थिऑसफीनें केलें असून पुष्कळ नवीन ज्ञान संपादित केलें आहे. तें ज्ञान समजून घेतल्यास हा भानगडीचा विषय आकलन करण्यास अगदीं सुलभ होतो.

पुनर्जन्माबद्दलही पुष्कळ संशोधन झालेलें आहे. माणूस पुनः पुनः जन्म घेतो हा सिद्धांत हिंदुधर्मांत ठिकठिकाणीं मांडलेला आहे. पण त्या सिद्धान्ताबद्दल फारशी शास्त्रीय माहिती आपल्या धर्मग्रंथांत नाहीं. मृत्यूनंतर माणसाचा लगेच पुनर्जन्म होतो, कीं मध्यंतरी बराच काल जाऊन त्यानंतर होतो, याबद्दलही कित्येक हिंदूंच्या मनांत घोटाळा झालेला आढळतो.[1] माणूस पुढल्या जन्मांत कदाचित् दगड होईल

---

१. क्षीणे पुण्ये मर्त्यलोकम् विशंति। या गीतावचनाचा आधार घेऊन कांहीं लोक दोन जन्मांत पुष्कळ कालाचें अंतर जात असतें असें मानतात. बृहदारण्यकोपनिषदांत ( ४, ४, ३ ) माणसाच्या पुनर्जन्मास गवतावरून चालणाऱ्या अळीची उपमा दिलेली आहे व कीड नव्या पातीचा आधार घेतल्यानंतरच मागील पातीचा आधार सोडते असें वर्णन केलेलें आहे. त्यावरून दोन जन्मांत अंतर नसतें असें कांहीं लोक म्हणतात. बृहदारण्यकांतील वर्णनाचा हा अर्थ चुकीचा आहे. हें सुज्ञांस सांगणें नकोच.

अथवा झाड होईल अथवा एकादा पशूही होईल, त्याला कांहीं धरबंध नाहीं, असें कांहीं लोक म्हणतात. हें खरें मानलें तर दर जन्मीं माणूस प्रगति करीत करीत शेवटीं ईश्वरासारखा होतो. ( बहूनाम् जन्मनामन्ते ज्ञानवान् माम् प्रपद्यते। गीता (७, १९) या उत्क्रान्तिक्रमास हरताळ फांसल्यासारखा होतो. पुरुष जरी पुढच्या जन्मीं दगड किंवा पशु झाला तरी त्याला स्त्रीचा जन्म येत नाहीं, अशी अनेकांची समजूत आहे. पुरुषदेहांतच मुक्ति आहे, पुरुष अतिशय कामुक असल्यास त्यास स्त्रीचा जन्म येतो, पण स्त्रीला पुरुषाचा जन्म येत नाहीं असें कित्येक ग्रंथांच्या आधारावर कांहीं लोक प्रतिपादितात. असल्या प्रकारच्या समजुती प्रचलित होण्याचें कारण हिंदुधर्माच्या आधारग्रंथांत पुनर्जन्माच्या सिद्धान्ताबद्दल स्पष्टार्थात्मक, तपशीलवार व व्यवस्थित अशी भरपूर माहिती दिलेली नाहीं, हें होय.

थिऑसफींत या विषयासंबंधाचें फार मोठ्या प्रमाणावर संशोधन झालेलें आहे. पुष्कळ व्यक्तींचे मागचे अनेक जन्म ओळीनें योगासिद्धीच्या सहाय्यानें तपासून पाहण्यांत आलेले आहेत. प्रत्येक माणसा सभोंवतीं त्याचे शत्रु-मित्र-नातलग-गुरुजन-सहकारी असे अनेक स्त्रीपुरुष दरजन्मीं असतात. कोणाचेही अनेक जन्म तपासले तर त्या जन्मांत हे स्त्रीपुरुषही वारंवार त्याच्या सान्निध्यांत ऋणानुबंधानें ओढले जात असतात, अशा रीतीनें एका माणसाचा मागला एक जन्म पाहिला तर त्यावेळीं त्याच्या कित्येक इष्टमित्रांचेही जन्म झालेले सांपडतात. असला हिशेब केल्यास थिऑसफीय संशोधनांत पुनर्जन्माचीं हजारों उदाहरणें तपासण्यांत आलीं आहेत, असें म्हणतां येईल. या उदाहरणांवरून मृत्यू-नंतर किती वेळानें पुन: जन्म येतो, स्त्रीला पुरुषाचा व पुरुषाला स्त्रीचा जन्म येऊं शकतो कीं नाहीं, माणसाला झाडाचा अथवा पशूचा जन्म येऊं शकतो कीं कसें, एका जन्मींचें दुष्कर्म माणसाला दुसऱ्या जन्मीं भोगावें लागतें कीं काय, कोणत्या नियमांनुसार माणसाला पुनर्जन्म मिळतो, माणूस कोठें जन्मावयाचा तें कसें ठरविलें जातें, जन्मोजन्मीं

माणसाची उत्क्रांति कशी होत जाते, वगैरे अनेक कठीण प्रश्नांवर थिऑसफीय संशोधनानें उत्कृष्ट प्रकारचा प्रकाश पाडलेला आहे.

**प्रश्न**—हें तुमचें संशोधन आम्ही खरें कां मानावें ?

**उत्तर**—खरें मानावें कीं मानूं नये तें तुमचें तुम्ही ठरवा. आमचा कांहींच आग्रह नाहीं. थिऑसफिकल सोसायटीच्या सभासदांनाही "तें अश्रद्धेय आहे" असें म्हणण्याची मुभा आहे. तुम्ही भाविक व श्रद्धाळू आहां कीं बुद्धिवादी आहां तें मला माहीत नाहीं. तुम्ही श्रद्धाळू असलां तर धर्माच्या बाबतींत (संशोधनाची खटपट न करतांही) जे ग्रंथांचे अर्थ, नुसत्या भाषापांडित्यावर लावले जातात त्यांवर तुम्ही श्रद्धा ठेवण्यास तयार होतां व संशोधनावर श्रद्धा ठेवण्यास तयार नाहीं असें म्हणतां. हा आग्रह नाहीं तर काय ?

तुम्ही बुद्धिवादी असलां तर हें संशोधन विश्वसनीय आहे असें दाखविणारीं कांहीं प्रमाणें मी तुम्हांसमोर ठेऊं इच्छितों. जसा एकादा शास्त्रज्ञ तोच तोच प्रयोग पुनः पुनः करतो अथवा त्याच त्याच गोष्टीचें वारंवार निरीक्षण करतो व अशा रीतीनें आपलें संशोधन बिनचूक होईल अशी खबरदारी घेतो, तशी खबरदारी थिऑसफीय संशोधकांनींही घेतलेली आहे. एका संशोधकानें एका अदृश्य प्रक्रियेचें निरीक्षण करावें, दुसऱ्या संशोधकानें त्याच गोष्टीचें स्वतंत्रपणानें निरीक्षण करावें व दोन्ही संशोधकांस तोच अनुभव आल्यास तें संशोधन निर्दोष मानावें, असा थिऑसफीय संशोधकांचा सामान्यतः परिपाठ आहे.[२] एकादी गोष्ट आपल्या बुद्धीला

---

१. पुनर्जन्मविषयक संशोधन The Lives of Alcyone खंड १ व २ व The Soul's Growth through Reincarnation नांवाच्या कित्येक पुस्तकांत आहे. पुनर्जन्माचे नियम या पुस्तकाखेरीज A Text Book of Theosophy व The First Principles of Theosophy या पुस्तकांतही आढळतील.

२. पहा The Astral Plane पृ. २ व ३ (आवृत्ति १९४९)

सयुक्तिक वाटली तर आपण ती खरी मानतों. थिऑसफीय संशोधन तुम्ही वाचलेंत तर तें सयुक्तिक आहें असें तुम्हांस वाटेल. तेव्हां तें खरें मानणें रास्त होय. कधीं कधीं त्या संशोधनाच्या खरेपणाचीं विशिष्ट प्रमाणेंही उपलब्ध होतात. उदाहरणार्थ माणसाच्या दृश्य देहाच्या आंतून सर्व देहभर त्याचा प्राणमय कोष ( Etheric Double ) पसरलेला असतो व तो हवेपेक्षां अधिक विरळ अशा द्रव्याचा बनलेला असतो, असें थिऑसफीय संशोधकांचें म्हणणें आहे. एकाद्या माणसाचा पाय त्याच्या गुडघ्याच्या वर कापला तरी गुडघ्याखालच्या पायांतील प्राणमय कोषाचा भाग कापला न जातां तसाच शाबूद राहिलेला असतो. असलीं माणसें पुष्कळदां त्या पायाच्या कापून टाकलेल्या बोटांच्या ठिकाणीं मला वेदना होत आहेत असा अनुभव सांगतात. हाडामांसाचीं बोटें जरी नष्ट झाली तरी त्या ठिकाणीं प्राणमय कोषाचा भाग तसाच असतो, व त्या भागांत चलबिचल होऊन माणसाला वेदना होतात असा आम्ही उलगडा केला तर तो सयुक्तिक होईल.[1] प्राणमय कोषाच्या अस्तित्वाचें हें एक प्रमाण होय. मरतांवेळीं हा प्राणमय कोष देह सोडून

---

१. कापून टाकलेल्या अवयवांच्या जागीं माणसाला ज्या दुखल्या-खुपल्या-सारख्या वेदना होतात त्यांना डॉक्टर लोक Phantom Pains अथवा 'वेदनांचा आभास' असें नांव देत असतात. माणसाच्या तळपायाला सुई टोंचली तर ती संवेदना ज्ञानतंतूंच्या द्वारानें तळपायापासून मेंदूपर्यंत जाऊन पोहोंचते, व त्या संवेदनेचा अर्थ करून अमुक अमुक जागीं सुई टोंचलीं आहे असें मेंदु ठरवितो. इंद्रियविज्ञानशास्त्राची अशी शिकवण आहे. गुडघ्याखालचा पाय कापून टाकला असल्यास गुडघ्यांतील ज्ञानतंतु कंपित होऊन ते जी संवेदना मेंदूपर्यंत पोहोंचवितात, तिचा अर्थ करतांना मेंदु चूक करितो, गुडघ्यांत वेदना आहे असा निर्णय करण्याऐवजीं नष्ट झालेल्या भागांत वेदना आहे असा चुकीचा निर्णय करतो, अशी उपपत्ति डॉक्टर लोक लावीत असतात. आमच्या वरील स्पष्टीकरणाच्या मानानें ह्या उपपत्तींत फारच ओढाताण आहे हें सांगणें नकोच.

बाहेर निघतो असें थिऑसफीय संशोधक म्हणतात. ही गोष्ट आम्ही अनेकदां पाहिली आहे असें कित्येक माणसांनीं नमूद केलें आहे.[1] प्राण-मय कोषाच्या अस्तित्वाचें हें आणखी एक प्रमाण होय. प्रत्येक जिवंत माणसाच्या देहाभोंवती ढगासारखी त्याच्या सूक्ष्म कोषाची आकृति असते, असें थिऑसफीय संशोधक म्हणतात. किल्नर नामक एका विद्युत्शास्त्रज्ञानें कांहीं कांचा तयार केलेल्या आहेत व त्या कांचांतून निरीक्षण केल्यास माणसाच्या देहाभोंवतीं एक ढग दिसतें.[2] थिऑसफीय संशोधनाच्या सत्यतेचा हा आणखी एक प्रकारचा पुरावा होय. थिऑ-सफीय संशोधनांत ज्या गोष्टी अगोदर सांपडल्या होत्या त्यांचा कधीं कधीं नंतर पडताळा आलेला आहे. उदाहरणार्थ, वीज ही कणांची बनलेली असते, व नेपचूनच्या पलीकडे आपल्या सूर्यमालेंत एकदोन ग्रह आहेत या गोष्टी प्रथम थिऑसफीय संशोधनांत प्रसिद्ध झाल्या व त्यानंतर इलेक्ट्रॉन, प्रोटॉन वगैरे विद्युत्कणांचा व प्लूटो नामक ग्रहाचा शास्त्रांनीं शोध लावला. रसायनशास्त्रांत आयसोटोप नामक चिजांचा शोध लागण्याच्या अगोदर थिऑसफीय संशोधकांनीं त्यांचा शोध[3] लाव-लेला नमूद आहे. असे अनेक पडताळे आलेले आहेत. त्या सर्वांचा निःपक्षपाती बुद्धीनें विचार केल्यास थिऑसफीचें संशोधन विश्वासार्ह आहे असें म्हणावें लागेल.

थिऑसफीय संशोधनानें हिंदुधर्माच्या ग्रंथांतील कांहीं विधानांचा समर्पक अर्थ लागूं शकतो हेंही या संशोधनाच्या सत्यतेचें आणखी एक प्रमाण होय.

---

२. पहा (प्रस्तुत ग्रंथकाराचें) ‘मृत्यु व मृत्यूनंतर’ नामक पुस्तक पृ. १०२–१०४.

३. पहा The Human Atmosphere by W. J. Kilner. कोष हे काल्पनिक आहेत हें प्रो. आर. डी. रानडे यांचें मत बरोबर नाहीं, हें या प्रयोगांवरून स्पष्ट आहे.

३. पहा Occult Chemistry (1951)

**प्रश्न**—थिऑसफीय संशोधनाच्या साहाय्यानें आमच्या धर्मग्रंथांतील कांहीं गोष्टींचा समर्पक अर्थ लावतां येतो म्हणजे काय ?

**उत्तर**—कांहीं उदाहरणें घेऊन हा मुद्दा स्पष्ट करतों. श्राद्धासंबंधानें मनूनें पुढील विधान केलेलें आहे :—

निमंत्रितान् हि पितरः उपनिष्ठन्ति तान् द्विजान्
वायुवच्चानुगच्छन्ति तथासीनानुपासते । ३·१८९

म्हणजे 'श्राद्धांत बोलावलेल्या ब्राह्मणांपाशीं मृतपितर वायूसारखे येऊन त्यांना अनुसरतात आणि तशा रीतीनें बसलेल्या ब्राह्मणांजवळ येऊन बसतात.' मृत माणसें मरणोत्तर भुवर्लोकांत जातात. तो भुवर्लोक कोठें दूर नसून हवेच्या वातावरणास व्यापूनच असतो असें थिऑसफीय संशोधक सांगतात; ही गोष्ट लक्षांत ठेविली तर मृत पितर श्राद्धाच्या वेळीं वायूसारखे कसे उपस्थित होतात त्याचें मर्म समजणें कठीण नाहीं.

'पृथिव्याम् या देवता सैषा पुरुषस्य अपानम् अवष्टभ्य'[1] ...

वगैरे प्रश्नोपनिषदांत लिहिलें आहे (३, ८). पृथ्वीमध्यें जी देवता आहे ती माणसाच्या अपानाला व्यापते असा त्या शब्दांचा अर्थ होतो. पण त्या अर्थावरून कांहींच अभिप्राय स्पष्ट होत नाहीं. थिऑसफीय संशोधक सांगतात कीं पृथ्वीच्या आंत एक शक्ति आहे आणि प्रत्येक माणसाच्या कमरेपाशीं जी कुंडलिनी नांवाची शक्ति असते ती या पृथ्वीच्या पोटांतील शक्तीपासून निघालेली असते. हें समजल्यावर वरील उपनिषद्वाक्याचा अर्थ जुळतो.[1]

ज्ञानदेवांनीं गोरोबा व मुक्ताबाई यांच्या भेटीची माहिती दिली आहे त्यांत

मोतियांचा चुरा फेंकला अंबारीं । विजूचिया परी कीळ (तेज) झालें ।
जरी पितांबरें नेसविलें नभा । चैतन्याचा गाभा नीळ बिंदु ॥

---

१. पहा लेडबीटर-कृत The Chakras

असें वर्णन आहे. म्हणजे त्या दोघांच्या भेटीच्या प्रसंगीं मोत्यांचा चुरा आकाशांत उधळला होता, विजेसारखें तेज तळपत होतें, आकाशाला जरीचा पितांबर नेसविला होता व निळया रंगाच्या बिंदूंत चैतन्य मुसमुसत होतें, असा देखावा ज्ञानेश्वरांनीं चित्रित केला आहे. नुसत्या भाषेकडे लक्ष दिल्यास या शब्दांचा कांहींच अर्थ होत नाहीं. पण थिऑसफीय संशोधक म्हणतात कीं जीं माणसें आध्यात्ममार्गावर पुढें गेलेलीं असतात त्यांच्या दृश्यदेहासभोंवतीं त्यांच्या सूक्ष्मदेहाचा एक मोठा प्रचंड गोळा पसरलेला असतो, तो गोळा तेजस्वी व नानारंगांनीं लकलकणारा असतो. दोन संत जर परस्परांच्या जवळ येऊन एकमेकांस भेटले तर ही दोन्हीं तेजोवलयें एकांत एक मिसळून रंगीबेरंगी दारू-कामासारखें नयनमनोहर दृश्य दिसूं लागतें. हें लक्षांत घेतल्यास ज्ञानेश्वरांच्या अभंगाचा अभिप्राय समजणें कठीण नाहीं.[1]

एके ठिकाणीं ज्ञानेश्वरांनीं विठोबाचें वर्णन पुढील शब्दांत केलें आहे :

तो हा देवादिदेव बरवा। पांडुरंग सदाशिव वाचा निजठेवा।
बापरखुमादेविवरु पंचविसावा। चोविसांमूर्ति वेगळा॥

म्हणजे 'विठोबा हा उत्कृष्ट अधिकाराचा देव आहे, चोवीस मूर्तींहून तो वेगळा पंचविसावा आहे' याचाही कांहीं अर्थ उमजत नाहीं.[2] पण थिऑसफीय संशोधक काय म्हणतात त्याचा विचार केल्यास या विधानावर प्रकाश पडतो. ते म्हणतात कीं आपल्या सृष्टींत एका विशिष्ट अशा उच्च पदाला पोंचलेल्या चोवीस व्यक्ति होत्या व सध्यांही आहेत. कांहीं

---

१. पहा साखरकृत सकलसंतगाथ्यांतील नामदेव गाथा क्रमांक १३४९. हा अभंग ज्ञानदेवगाथ्यांत न छापतां चुकीनें नामदेव–गाथ्यांत छापलेला दिसतो. सूक्ष्मदेहांच्या मिश्रणानें दिसणाऱ्या रंगांचें वर्णन The Masters & the Path या पुस्तकांत (१९२७) पृ. १४६–१४७ व २५६–२५७ वर आहे

२ पहा साखरेकृत सकळसंतगाथेंतील ज्ञानदेव गाथा क्रमांक ९० व The Masters & the Path पृ. ४४७ (१९२७)

शतकांच्या पूर्वी आणखी एक व्यक्ति त्या चोविसांच्या मालिकेंत समाविष्ट झाली असून ती पंचविसावी आहे. यावरून थिऑसफीय संशोधक व ज्ञानेश्वर या दोघांचा अनुभव मूलतः एकाच निर्झरांतून आलेला आहे असें उघड होतें. ज्या संशोधनाच्या आपल्या जुन्या ग्रंथावर अशा प्रकारचा प्रकाश पडतो तें खरें असलें पाहिजे असें मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

**प्रश्न**—आपल्या पुराणादि ग्रंथांत समुद्रमंथन, दशावतार, सप्तसमुद्र, सप्तद्वीपें वगैरेसारख्या ज्या विचित्र गोष्टी आहेत त्याबद्दल थिऑसफीचें काय म्हणणें आहे?

**उत्तर**—हे ग्रंथ काव्यमय आहेत. ते शास्त्रीय पद्धतीनें लिहिलेले नाहींत. कारण जुन्या काळीं हल्लींच्या सारखी शास्त्रीय पद्धति लोकप्रिय नव्हती. या गोष्टींपैकीं कांहीं लाक्षणिक आहेत. समुद्रमंथनाच्या गोष्टींत खोल अर्थ आहे. देव दानवरूपी दोन परस्परविरोधी शक्तींनीं द्रव्याच्या समुद्रांत भोंवरा निर्माण करून निरनिराळ्या जिनसा उत्पन्न केल्याची ही गोष्ट उत्क्रान्ति—वादाची निदर्शक आहे. मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह वगैरेंची मालिकाही उत्क्रान्तीचे टप्पे सांगण्याकरितां आहे. पुराणांतील कांहीं गोष्टी लाक्षणिक अर्थानें घेण्याच्या आहेत व कांहीं लाक्षणिक नाहींत. उदाहरणार्थ सृष्टीची उत्पत्ति, पूर्वींचीं मन्वंतरें, त्या मन्वंतरांतील प्राचीन काळचे मानववंश, यांची माहिती पुराणांत दिलेली असते. त्या जुन्या काळीं पृथ्वीवरील परिस्थिति फार निराळी होती. त्यावेळचीं तीं वर्णनें आहेत. तीं जरी आपणांस आज विचित्र व असंभाव्य वाटलीं तरी तीं प्राचीन ऋषिमुनींनीं योगसिद्धींच्या साहाय्यानें केलेल्या संशोधनाची काव्यमय वर्णनें आहेत, असें (तीं पाहिल्यावर) थिऑसफीय संशोधक म्हणतात.[1]

---

१ पहा डॉ. बेझंटकृत Pedigree of Man पृ. ८२ (आवृत्ति १९४३) व Sanatana Dharma Advanced Text Book Of Hindu Religion & Ethics पृ. २७ (आवृत्ति १९४०). समुद्रमंथनाच्या अर्थासाठीं पहा, Evolution Of Life and Form पृ. ४१ (१९०९)

तुम्ही मला इतके प्रश्न विचारलेत. त्यावरून हिंदुधर्माविषयीं तुमच्या मनांत अभिमान आहे हें मी ओळखलें आहे. म्हणूनच मी तुम्हांस एक प्रश्न विचारतों. गायत्री मंत्र हा एक परम पवित्र मंत्र आहे, व तो सूर्यासंबंधीचा आहे हें तुम्हांस ठाऊक असेलच. हा मंत्र म्हटल्यावर त्याचा काय काय परिणाम होतो तें तुम्हांस माहीत आहे का ?

**उत्तर**—नाहीं, मला माहीत नाहीं. तुम्हांला माहीत आहे का ?

**उत्तर**—त्याचें संशोधन थिऑसफिकल सोसायटींत झालेलें आहे. आपण सर्व गायत्रीबद्दल मनांत आदर बाळगणारे. पण तुम्ही हिंदुधर्मांतल्या साऱ्या पंडितांना विचारून पहा. हा मंत्र म्हटल्यावर त्याचा नक्की कोणता परिणाम होतो तें एकजणही सांगूं शकणार नाहीं. प्रत्येक मंत्रांत कांहीं शक्ति असते, त्यामुळें अदृश्य असा त्या मंत्राचा परिणाम होत असतो. ज्याला योगसिद्धि प्राप्त झालेली असेल त्याला तो परिणाम प्रत्यक्ष दिसतो. योगसिद्धि असणाऱ्या माणसासमोर गायत्रीचा मंत्र पुनः पुनः म्हणावयाचा, व काय परिणाम होतो तें त्या माणसानें बारकाईनें तपासून पहावयाचें, असा एक अत्यंत महत्त्वाचा उद्योग थिऑसफिकल सोसायटींत करण्यांत आलेला आहे.[1] त्यावरून दिसून येतें कीं अर्थाकडे लक्ष देऊन गायत्री मंत्र नीटपणें म्हटला तर सूर्यापासून एक तेजाची रेषा मंत्र म्हणणाऱ्याकडे येऊन त्याच्या अंगांत प्रवेश करते, व त्याचा देह व्यापून देहांतून सात सुरळ्यांनीं बाहेर पडते. त्या रेषेचा त्या माणसाला फायदा होतो, व सभोंवतालीं असणाऱ्या माणसांवर त्या सुरळ्यांचा परिणाम होऊन त्यांची बुद्धीही किंचित्काळ उत्तेजित होते; आणि सभोंवतालचें सारें वातावरण उच्च बनतें. ऋग्वेदादि ग्रंथांतील ऋचा व मंत्र आणि गायत्री हीं घेऊन थिऑसफीनें एक हिंदु सामुदायिक पूजा बनविलेली

---

१. **टीप**—पहा A Congregational Pooja for The Hindus ह्या पुस्तकांतील A Temple Thought Form नामक प्रकरण यांत गायत्री मंत्राचे व पूजाविधींचे अदृश्य परिणाम दिलेले आहेत.

आहे. ती जुन्या परंपरेस धरूनच आहे; पण ती सर्वांनीं एकत्र मिळून करावयाची आहे. ही पूजा केल्यानें कोणते अदृश्य परिणाम घडून येतात तें बारकाईनें तपासण्यांत आलें आहे. ही पूजा लक्ष लाऊन व समजून घेऊन करावी लागते. पुष्कळांनीं ती तशी सामुदायिक रीतीनें केल्यास त्या पूजेचा परिणाम म्हणून प्रत्येक माणसाचें हृदय—मन जोरदार, शुद्ध व सुसंस्कृत होतें व सभोंवतालच्या प्रदेशांतलें भावना—विचारांचें वातावरण-ही उच्च बनतें. पूजा एकदांच केल्यास तात्पुरता चांगला परिणाम होईल; पण वारंवार व नियमानें केल्यास व्यक्तीवर व समाजावर एकंदर परिणाम फार मोठा होतो, त्या वातावरणांत सर्वांच्या सद्वृत्ति वाढीस लागतात, दुर्वृत्तींस पायबंद बसतो, आणि समाज सुसंस्कृत होणें सुकर होतें. अशा प्रकारच्या पूजा ठिकाठिकाणीं देशभर पुनः पुनः करण्यांत आल्या तर त्यांतील मंत्राचा परिणाम होऊन देशांतील हृदय—मनाचें सारें वातावरण निवळेल व देशाची प्रगति करण्याचे जे प्रयत्न आपण करतों त्यांस जोर येईल. थिऑसफीचें एक काम जगांतील प्रत्येक धर्माला आजच्या कालमानानुसार जरूर तें साहाय्य देणें हें आहे. हिंदुधर्मीयांसमोर ही पूजा त्याच बुद्धीनें ठेवण्यांत आली आहे.

प्रत्येक धर्मांत कर्मकांड असतें. कर्मकांड म्हणजे नुसती कवाईत नव्हे. ते विधि नीट केले तर त्याचा व्यक्तीवर व समाजावर सुपरिणाम होऊन संस्कृतीचा परिपोष होत असतो. धर्मांतील कर्मकांडाचा हा उपयोग होय, अशी थिऑसफीची शिकवण आहे.

**प्रश्नः**—हिंदु धर्मांत नसलेल्या अशा अजी नवीन गोष्टी थिऑसफींत आहेत का ?

**उत्तरः**—पुष्कळ आहेत. आज जनमनासमोर पुष्कळ नवीन प्रश्न आलेले आहेत. त्यासंबंधाचें थिऑसफीय संशोधनही आज नवीन आहे. मनुष्यकोटि व प्राणिकोटि या दोन कोटि आहेत असें हिंदुधर्मांत सांगित-लेलें आहे. पण आजचे प्राणिशास्त्रज्ञ या दोन स्वतंत्र कोटि मानीत नसून

मनुष्य हा एक प्राणी आहे असें समजून त्याचा समावेश ते प्राणिकोटींतच करतात. हिंदुधर्मांत माणसाच्या जीवात्म्याचें स्वरूप सांगितलेलें आहे. माणूस व इतर प्राणी जर एकाच वर्गांत मोडत असतील, तर प्राण्याचा जीवात्मा कसा असतो हा प्रश्न मनासमोर सहजच उभा रहातो. माणसाला जर जडदेह, वासनादेह, मनोदेह, असतील तर ते प्राण्यालाही —कुत्र्याला अथवा घोड्याला—असतात का? असा प्रश्न आज उत्पन्न होत आहे. या गोष्टीचें संशोधन थिऑसफींत झालेलें आहे. त्यावरून स्पष्ट होतें कीं प्रत्येक माणसाला कारणदेह, मनोदेह, वासनादेह, प्राणमयकोष व दृश्यदेह अशा पांच स्वतंत्र उपाधि असतात. कुत्रा, घोडा वगैरे प्राण्यांना कारणदेह नसतो, पण इतर उपाधि असतात. जेव्हा कुत्रा–घोडा वगैरे प्राणी उत्क्रान्तिमार्गावरून अधिकाधिक प्रमाणांत गुणविकास करीत पुढें जातात, तेव्हां त्यांच्या जीवनांत असा एक टप्पा येतो, कीं त्या टप्प्यावर त्यांना सृष्टि कारणदेह पुरविते व त्यावेळीं प्राणिकोटींतून तो मानवकोटींत प्रविष्ट होतो. पुढें त्याच्या मानवी जन्मांस सुरवात होते व मग तो पुनः प्राण्याच्या जन्मास जात नाहीं असा अनुभव आहे.[1] प्रत्येक माणसाला जो वेगवेगळा कारणदेह असतो, तो त्याला मीपणाची स्वतंत्र जाणीव देतो. प्राण्यांचें तसें नसतें. त्यांना माणसासारख्या इतर सर्व उपाधि असल्या तरी मीपणाची स्वतंत्र जाणीव देणारा कारणदेह नसतो. म्हणून माणसाच्या जीवाला जीवात्मा म्हणतात व प्राण्यांच्या जीवाला 'संघात-जीव' (group soul) म्हणतात.[2] या संघात–जीवाची माहिती हिंदुधर्मांत आढळत नाहीं.

---

१ अरविंद घोषही तसेंच म्हणतात (पहा Divine Life खंड २ पृ. ७११ आवृत्ति १९४०)

२. खानिज कोटि वनस्पति कोटि ही संघात-जीवांची बनलेली असते. संघात-जीवांची माहिती डॉ. बेझटंकृत A Study in Consciousness व लेडबीटरकृत A Text Book of Theosophy वगैरे पुस्तकांत सांपडेल.

'राष्ट्र' हा देखील एक वेगळा जीव आहे असें थिऑसफीचें म्हणणें आहे. माणसाच्या देहांत पेशी ( cells ) असतात. प्रत्येक पेशी म्हणजे एकेक स्वतंत्र जीव होय. या पेशींचा 'संघात' जमून मनुष्याचा दृश्य-देह तयार होतो व त्या देहांत मनुष्याचा जीवात्मा रहातो. तद्वत् माणूस हा एक स्वतंत्र जीव होय. माणसांचा 'संघात' जमून जी चीज तयार होते तिला आपण राष्ट्र म्हणतों. एक वेगळा व व्यापक असा जीव त्या संघातांत रहात असतो.[1] जसा माणसाचा जीवात्मा अनेक जन्म घेतो व दर जन्मीं नव्या दृश्य देहांत रहातो, त्याप्रमाणें राष्ट्र नांवाचा जीवही अनेक जन्म घेतो व दर जन्मीं नव्या मानवसमूहांत रहातो. इतिहासाच्या रंगभूमीवर जे राष्ट्रांचे उदयास्त दिसतात, त्यांत याचीं उदाहरणें सापडतात. राष्ट्रें सामुदायिक कर्म करतात आणि त्याचीं बरींवाईट फळें भोगतात. राष्ट्ररूपी जीव आणि त्याचें सामुदायिक कर्म या गोष्टी हिंदु-धर्मांत नमूद झालेल्या नाहींत. अशा अनेक नवीन गोष्टी थिऑसफींत आहेत. उदाहरणादाखल मी फक्त दोनच तुम्हांस सांगत आहें.

**प्रश्नः**—थिऑसफिस्ट लोक सुधारक आहेत कीं, जुन्याचे पुरस्कर्ते आहेत?

**उत्तर**—थिऑसफिकल सोसायटींत सर्वांना मतस्वातंत्र्य आहे व थिऑसफिस्टानें अमुक मानलें पाहिजे असें त्याच्यावर कोणतेंही बंधन नाहीं. सामान्यतः धर्मावर प्रेम असणारीं माणसें जुन्या मतांचीं, सुधारणांस विरोध करणारीं व प्राचीन काळाकडे नजर लावणारीं असतात. थिऑसफीची वृत्ति ह्याच्या उलट आहे. सर्व धर्मांत व समाजांत क्रूरपणाच्या व अन्यायाच्या चालीरीति असतात. अज्ञानमूलक वेडगळ

---

१. या विषयाची जास्त माहिती जिनराजदासकृत Theosophy & Modern Thought या पुस्तकांत व्याख्यान दोन मध्यें सांपडेल. राष्ट्र नांवाचा एक व्यापक जीव असतो व त्या संबंध राष्ट्राचें सामुदायिक असें बरेंवाईट कर्म असतें असें अरविंद घोष यांनींही म्हटलें आहे.

प्रकारही असतात. ते बद्दलण्याचा प्रयत्न केल्यास धर्मनिष्ठ माणसें प्रायः विरोध करतात. थिऑसफीची दृष्टि प्राचीन काळाकडे लागलेली नसून आधुनिक व भविष्य काळाकडे लागलेली आहे. म्हणूनच आधुनिक काळाला व भविष्यकाळाला जरूर असतील त्या सर्व सुधारणांना थिऑसफीचा पाठिंबा आहे. जगांत विश्वबंधुत्वाचें साम्राज्य व्हावें हें थिऑसफीचें मुख्य ध्येय आहे. जगांतील भावी धर्मांची थिऑसफी ही कोनशिला आहे असें म्हणतां येईल.

**प्रश्न**—तुम्ही हिंदुधर्म खरा मानतां कीं नाहीं ?

**उत्तर**—अलबत् खरा मानतों. तर मग मुसलमानी धर्म, ख्रिस्ती धर्म झरथुष्ट्री धर्म हे खोटे आहेत असें तुम्हांस कसें वाटत नाहीं ?

**प्रश्न**—ज्या गोष्टी माणसाला दिसत नाहींत त्यांचें सुसंगत ज्ञान म्हणजे 'धर्म' होय. मृत्यूनंतर काय होतें, ईश्वर आहे कीं नाहीं, ईश्वरानें जग कसें निर्माण केलें, माणसाला एक जन्म असतो कीं अनेक असतात, त्यानें दुसऱ्याचें नुकसान केल्यास त्याचें फळ त्याला भोगावें लागतें कीं नाहीं वगैरे प्रश्न न दिसणाऱ्या गोष्टींविषयींचे आहेत. त्या गोष्टींचें सुसंगत ज्ञान म्हणजेच धर्म. हा धर्म मूलतः एकच असला पाहिजे हें उघड आहे. ईश्वर आहे कीं नाहीं याबद्दल मतभेद होऊं शकेल; पण जर तो खरोखरी असला तर हिंदु-मुसलमान-पारशांनीं वा नास्तिकांनीं तो नाहीं असें म्हटलें तर तो नाहींसा होणार नाहीं. जर तो खरोखरी नसला तर अमक्या पवित्र ग्रंथांत तो आहे असें सांगितल्यामुळें तो उत्पन्न होणार नाहीं. ईश्वराचें अस्तित्व ग्रंथांतील विधानावर अथवा माणसांच्या मानण्यावर अवलंबून नाही. माणसाचा पुनः जन्म होतो कीं, काय ? याबद्दल मतभेद होऊं शकेल. पण जर पुनः जन्म होत असला, तर माझें मत कांहींही असो, तुमचेंही कांहींही असो, सृष्टिक्रमानुसार आपणां दोघांनाही पुनः जन्म येणारच. आपणांलाच काय पण मुसलमानालाही येणार. हिंदूचा देह व मुसलमानाचा देह दोन्हीही

मानव–देह आहेत. दोघांच्या देहाला तेच नियम लागू आहेत. एरंडेल दिलें तर दोघांनाही रेच होतात. कोयनेल दिलें तर दोघांचाही मलेरिया बरा होतो. टायफॉईडच्या जंतूंनीं दोघांनाही टायफॉईड होतो. दोघांचें अंतरंगही मानवी अंतरंग आहे. टवाळखोर माणसानें हिंदूला टांचणी टोंचली अथवा मुसलमानाला टोंचली तर दोघांनाही सारख्याच वेदना होतात. दोघांच्या हृदयांत संतापाची एकच भावना उद्भवते व ही टांचणी टवाळीच्या हेतूनें त्यानें टोंचली आहे असें तर्कशास्त्र ते दोघे लढवितात. त्या दोघांच्या शरीराला व अंतर्यामाला एकच सृष्टिनियम लागू आहेत. हा हिंदु आहे म्हणून त्याला दुसरा जन्म येईल व हा मुसलमान आहे म्हणून त्याला येणार नाहीं, असा फरक होणार नाहीं. पुनर्जन्माची प्रक्रिया जर होत असली तर ती सृष्टिनियमांनुसार होत असणार आणि सर्व माणसें तिच्या कक्षेंत येणार. अर्थात् सृष्टींतल्या अदृश्य गोष्टीचें ज्ञान म्हणजे जर धर्म, तर तो धर्म एकच असावयाचा. अदृश्य सृष्टीचें ज्ञान प्राप्त करून घेऊन जर तें श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत सांगितलें तर आपण त्याला हिंदुधर्म म्हणतों, गौतम बुद्धांनीं पाली भाषेंत मांडलें तर आपण त्याला बुद्धधर्म म्हणतों, आणि ख्राइस्टनें ॲरमाईक भाषेंत व्यक्त केलें कीं ख्रिश्चनधर्म असें नांव देतों. या दृष्टीनें थिऑसफी जगांतील धर्मांकडे पहाते आणि सर्व धर्मांचा समन्वय करते. आज जगांतील धर्म अवनत झाले असले तरी ते मूळांत ज्ञानावर आधारलेले आहेत, आणि ते सर्वच खरे आहेत असें आमचें म्हणणें आहे. हा दृष्टिकोण नवीन आहे आणि जगांतील सर्व धर्मांचा समन्वय करण्याला आणि त्यांमधील, भांडणें मोडण्याला अत्यंत आवश्यक आहे. या रीतीनें थिऑसफी सर्व धर्मांचा व धर्म व विज्ञान यांचा समन्वय करीत असते.

**प्रश्न**—हें जर खरें, तर जगांतील निरनिराळया धर्मांत विरोध कां असावे ?

**उत्तर**—बहुतेक सर्व विरोध चालीरीतींचे आहेत, ज्ञानविषयक

नाहींत. ग्रंथांच्या अर्थाची ओढाताण केल्यामुळें, तसेंच अज्ञानामुळें व लोकांच्या भांडखोर वृत्तीमुळेंही निरनिराळ्या धर्मांत आभासिक विरोध दिसतात. एकाद्या शास्त्रज्ञाला त्याच विषयावर निरनिराळ्या ठिकाणीं व्याख्यानें देण्यास सांगितलें तर त्याचीं सारीं व्याख्यानें तंतोतंत एकाच छापाचीं होतील असें नाहीं. श्रोत्यांचा मगदूर किती आहे, त्यांना कोणत्या गोष्टींचा जास्त उपयोग आहे, त्यांच्या मनांत कोणते दुराग्रह आहेत, त्या श्रोत्यांना कोणत्या कार्यास उद्युक्त करावयाचें आहे, वगैरे अनेक गोष्टी विचारांत घेऊन तो आपलें व्याख्यान दरवेळीं वेगवेगळ्या रीतीनें देईल. एके ठिकाणीं एका मुद्यावर भर देईल, तर दुसऱ्या ठिकाणीं दुसऱ्यावर देईल. एके ठिकाणीं युक्तिवादाचें विवरण करील, तर दुसऱ्या ठिकाणीं श्रोत्यांच्या भावना उचंबळतील अशा धोरणानें बोलेल. एके ठिकाणीं कठीण गोष्टी सांगेल, तर दुसऱ्या ठिकाणीं त्या समजण्यासारख्या नाहींत म्हणून त्यांचा संक्षेप करील, अथवा त्या अजीबात गाळून टाकील. जगांतील धर्म हे असल्या व्याख्यानांसारखे आहेत. त्यांत ज्ञान एकच असलें तरी मांडणी परिस्थित्यनुरूप बदलली आहे. थिऑसफींत पुनर्जन्माचें पुष्कळ संशोधन झालेलें आहे. त्यांत असें आढळलें आहे कीं, ज्यांस आपण हिंदू लोक व्यास म्हणतों त्याच महापुरुषानें झोरोअस्टर, हर्मीज्, ऑर्फियस् व गौतमबुद्ध असे वेगवेगळे इतिहासप्रसिद्ध जन्म घेऊन निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या धर्मांची व संस्कृतींची पूर्वीं स्थापना केलेली आहे.

**प्रश्न**—थिऑसफी हा धर्म आहे का? ज्याअर्थीं थिऑसफींत संशोधन आहे त्याअर्थीं थिऑसफी हें सायन्स ( विज्ञान ) आहे का?

**उत्तर**—थिऑसफीला अनेक बाजू आहेत. धर्माच्या क्षेत्रांतील सर्व प्रश्न ज्याअर्थीं थिऑसफींत आहेत त्याअर्थीं थिऑसफीला 'धर्म' म्हणतां येईल. थिऑसफी म्हणजे जगांत जे आज अनेक धर्म आहेत त्यांतला

अमुक एक धर्म, असें मात्र नाहीं. त्या अनेक धर्मांतला जो सामान्य भाग आहे त्याला थिऑसफी म्हटलें तर तें अधिक समर्पक होईल. थिऑसफीला सायन्स असेंही म्हणण्यास अडचण नाहीं. धर्मालाही 'सायन्स' हें नांव देण्यास हरकत नाहीं. ज्या गोष्टी सामान्य माणसाला दृश्य आहेत त्यांच्या संशोधनाला सायन्स ( विज्ञान ) म्हणतात, तर ज्या गोष्टी सामान्य माणसाला दृश्य नाहींत त्यांच्या संशोधनाला धर्म म्हणतात. तेव्हां धर्म व सायन्स यांचे प्रकार अगदीं वेगळे होऊं शकत नाहींत. थिऑसफीला पंथ असें म्हणणें मात्र योग्य नाहीं. कारण प्रत्येक पंथांत अमुक अमुक गोष्टी मानल्या पाहिजेत असें बंधन असतें. थिऑसफी हें ज्ञान आहे. तें तुम्हीं मानलें पाहिजे असें त्या ज्ञानाचें कोणत्याही माणसावर बंधन नाहीं. थिऑसाफिकल सोसायटी ही थिऑसफीच्या प्रसारार्थ स्थापन केलेली संस्था आहे. पण त्या सोसायटींतील सभासदानें थिऑसफीची अमुक एक गोष्ट मानली पाहिजे असा निर्बंध नाहीं. मानण्याचें अथवा न मानण्याचें स्वातंत्र्य थिऑसफिकल सोसायटीच्या प्रत्येक सभासदाला दिलेलें असतें. हें स्वतंत्र वातावरण सायन्सच्या क्षेत्रांतल्यासारखें आहे. धर्मांत बहुधा तें आढळत नाहीं.

**प्रश्न**—आधुनिक विज्ञान व थिऑसफी हीं एकच आहेत असें म्हणतां येईल काय ?

**उत्तर**—नाहीं. आधुनिक विज्ञान फक्त दृश्य सृष्टीचें संशोधन करतें, सबंध सृष्टीचें करीत नाहीं. दृश्य सृष्टि ही सबंध सृष्टीचा अगदीं लहानसाच भाग आहे. फक्त या लहान भागाचें संशोधन विज्ञानांत येत असल्यामुळें त्यांत आकुंचितपणा व एकांगीपणा हे दोष आज शिरलेले दिसत आहेत आणि म्हणून आजचें विज्ञान जडवादाच्या वळणावर गेलेलें आहे. थिऑसफींत अतींद्रीय सृष्टीचें संशोधन असल्यामुळें थिऑसफीय दृष्टीला तें वळण चुकीचें वाटतें. त्यासाठीं विज्ञानाच्या कित्येक सिद्धांतांत थिऑसफीला कांहीं भर टाकावी लागली आहे.

उत्क्रान्ति-वादाचें उदाहरण घेऊन हा मुद्दा स्पष्ट करतों.[1] भौतिक शास्त्रानें निरनिराळया वनस्पति–जाति व प्राणि–जाति ओळीनें मांडून त्यांचा एक चढता क्रम बनविला आहे. त्याला ते उत्क्रान्ति–क्रम म्हणतात. हा क्रम थिऑसफीला सामान्यतः मान्य आहे. पण थिऑसफीचें म्हणणें असें आहे कीं, या क्रमांत येणाऱ्या वनस्पति व प्राणि हे फक्त ‘ देह ’ आहेत. त्या देहांत वेगळे जीव रहात असतात. शास्त्रज्ञ जेव्हां वडाचें झाड अथवा वानर यांचें वर्णन सांगतो तेव्हां तें वर्णन त्यांच्या देहाचें असतें. पण वडाच्या झाडांत आणि वानरांत जीवांचें वास्तव्य असतें, किंबहुना त्या जीवांसाठींच वडाचें झाड व वानर हे देह असतात. शास्त्रज्ञांचा उत्क्रान्तिक्रम फक्त देहांचा आहे. त्या क्रमाशीं समांतर असणारा दुसरा ( जीवांचा ) एक उत्क्रान्तिक्रम असतो आणि जीव जेव्हां पायरी पायरीनें अधिक ज्ञानी व कर्तृत्ववान् होत जातो, तेव्हां त्याच्या पडताळयानें त्याला सृष्टि अधिक उपयुक्त व सोईस्कर

---

१. थिऑसफीच्या संशोधनापासून आपल्या हिंदुतत्त्वज्ञानाला कित्येक ठिकाणीं जास्त तपशीलवार व आधुनिक शास्त्रीय परिभाषेची नवीन माहिती मिळत आहे. एकपंचीकरणाचें उदाहरण घेऊं. पंचीकरण म्हणजे पंचमहाभूतांचें मिश्रण. हा विषय आपल्या महाभारत (शांति पर्व–अध्याय १८४), दासबोध (दशक १७–८) वगैरे ग्रंथांतून दिलेला आहे. पण तो देतांना, अन्तःकरण, प्राण, ज्ञानेंद्रियें, कर्मेन्द्रियें व विषय यांची पंचकें देऊन, त्यांत कोणांत कोणत्या तत्त्वाचें आधिक्य आहे तें सांगून, कोणत्या तत्त्वाशीं मिश्रण झालें असतां पंचक तयार होतें, इतकेंच सांगितलेलें असतें. पण मिश्रणाचें प्रमाण किती हें सांगितलेलें नाहीं.

शंकराचार्यांनीं आपल्या पंचीकरणप्रकरणांत प्रमाण दिलें आहे, तें असें. एका तत्त्वाच्या निम्या ( $\frac{1}{2}$ ) भागांत, दुसऱ्या तत्त्वाच्या ८ व्या ( $\frac{1}{8}$ ) भागाशीं मिश्रण झालें म्हणजे पंचीकरण होतें. असें केवळ विवक्षित भागाच्या अगर अंशाच्या भाषेंत त्यांनीं विवरण केलें आहे.

[ पुढील पानावर पहा. ]

असा देह पुरवीत असते. या दोन क्रमांपैकीं शास्त्रज्ञ फक्त देहाचा क्रम हिशेबांत घेतात. पण दुसरा ( जीवाचा, चैतन्याचा ) क्रम हिशेबांत न घेतल्यास उत्क्रांतिवादाचें विवरण एकांगी होऊन कांहीं न सुटण्यासारखे प्रश्न निर्माण होतात असें थिऑसफीचें म्हणणें आहे.

सायन्समध्यें सद्‌गुण, सदाचार, नीति यांना स्थान नाहीं. थिऑसाफी-मध्यें त्यांना अग्रपूजेचा मान आहे. थिऑसाफी व सायन्स यामध्यें हाही आणखी एक मोठा फरक आहे. हे दोष वगळल्यास, एकंदरींत सायन्सचें कार्य थिऑसाफीला प्रशंसनीयच वाटतें. या मार्गानेंही सायन्स व थिऑसाफी यांचा आम्ही समन्वय करीत आहों.

---

[ मागील पानावरून चालू ]

पण थिऑसफीय ग्रंथांतून आधुनिक परिभाषेंत हें विवरण कसें दिलें आहे तें पहा. सृष्टींत सात लोक आहेत. प्रत्येक लोकांतील द्रव्याचा परमाणू ( किंवा तत्त्व ) तन्मात्रेनें निर्मिला जातो. ईश्वराच्या महत् नामक तन्मात्राशक्तीनें निरवयव मूळप्रकृतींत आदितत्त्व नांवाचे आद्य परमाणू उत्पन्न झाले. हा गोलोक ( म्हणजे पहिला लोक ) होय; नंतर त्याच्या अहंकार नामक तन्मात्रा शक्तीनें वरील ४९ आद्य परमाणू एकत्र गुंफिले जाऊन वैकुंठ लोकांतील ( दुसऱ्या लोकांतील ) अनुपादक तत्त्व ( ॲटम् ) उत्पन्न झालें. पुनः त्याच्या शब्द-तन्मात्रेनें $४९^{२}$ म्हणजे २४०१ अनुपादक परमाणु गुंफून वरील प्रक्रियेनें ब्रह्मलोकांतील आकाश तत्त्व ( ॲटम ) बनले. याप्रमाणें उत्तरोत्तर खालीं येत येत, ($४९^{३}$), ($४९^{४}$), ($४९^{५}$), ($४९^{६}$) हीं तत्त्वें किंवा परमाणु ( ॲटम्स ) स्पर्श, रूप, रस, गंध या तन्मात्रांनीं वायु, तेज, आप व पृथ्वी, या नांवांचीं तत्त्वें उत्पन्न झालीं. म्हणजे $४९^{६}$ आद्य परमाणूंपासून भूलोकाचें पृथ्वी-तत्त्व किंवा परमाणु (ॲटम) बनलेलें आहे. हाच Ultimate atom of the physical plane म्हणजे भूलोकाचा परमाणु होय. ( पहा—Text Book of Theosophy-by C. W. Leadbeater व Ancient Wisdom आणि Evolution of Life & Form-by Annie Besant ).

**प्रश्न**—धर्म हें सायन्स ( विज्ञान ) आहे असें तुम्हीं कां म्हणतां? त्यानें धर्माचा दर्जा कमी होतो असें नाहीं का तुम्हांला वाटत?

**उत्तर**—अनुभवावर आधारलेल्या ज्ञानक्षेत्राला हल्लीं विज्ञान अथवा सायन्स असें नांव देतात आणि विज्ञानांतील त्या अनुभवाला अवलोकन, प्रयोग, संशोधन, असें म्हणतात. धर्म हा कोणाच्याही मतावर अथवा कल्पनेवर आधारलेला नसतो. म्हणून धर्माला आम्ही अदृश्य सृष्टीचें विज्ञान अथवा सायन्स असें नांव देतों. शनीला कडें आहे, हैड्रोजन ऑक्सिजन या दोन वायूंपासून पाणी निर्माण होतें, आणि झाडाचीं पानें श्वासोच्छ्वास करीत असतात, या गोष्टी जितक्या सत्य आहेत तितकेच धर्माचे सिद्धांत—मृत्यूनंतरही माणसाचा जीव शिल्लक रहातो, माणसाला अनेक जन्म असतात वगैरे सिद्धांत--खरे आहेत हें माणसाच्या मनावर ठसवावयाचें असलें तर धर्म हें सायन्स आहे असें म्हटलें पाहिजे. गुरुत्वाकर्षणाचा नियम समजून वा न समजून आपण मोडला आणि कड्यावरून पुढें पुढें चालत गेलों तर आपण खालीं कोसळूं आणि आपलें हात पाय मोडतील, हें जसें निश्चित आहे, तसाच धर्मही निश्चित आहे, आणि आपण दुसऱ्यास अपकार केला तर तो अपकार अपणांकडे परत येऊन आपलें नुकसान करील हेंही अटळ आहे. धर्म हें अदृश्य सृष्टीचें शास्त्र आहे असें म्हटल्यानेंच ही निश्चिति माणसाला उमजते. हिंदुधर्माच्या आजच्या स्वरूपांत हा मुद्दा बिलकुल स्पष्ट होत नाहीं. तो तसा स्पष्ट न झाल्यानें हिंदुधर्मांतील कित्येक जिव्हाळ्याच्या गोष्टी आज निर्माल्यवत् झाल्या आहेत.

**प्रश्न**—अशा गोष्टी कोणत्या?

**उत्तर**—नीतीची गोष्ट घ्याना. आज ती निर्माल्यवत् झाली आहे. माणसाचें व राष्ट्राचें वर्तन नीतीला धरून असलें पाहिजे, या गोष्टीवर आज हिंदूंची जिव्हाळ्याची श्रद्धा नाहीं. सदाचाराला समाजांत खरोखरी मान नाहीं. हा मान जोंवर समाजांत मिळत नाहीं, तोंवर जनता सुखी व

सुसंस्कृत होण्याची आशा नाहीं. वरील प्रकारानें धर्म, सायन्स व नीति या तिहींचा समन्वय करण्याचें थिऑसफीचें धोरण आहे.

**प्रश्न**—निर्माल्यवत् झालेल्या अशा आणखी कोणत्या गोष्टी आहेत?

**उत्तर**—अशा गोष्टी किती तरी आहेत. त्या सर्वच सांगूं लागलों तर पुष्कळ वेळ लागेल. म्हणून उदाहरणादाखल दोनच निवडून सांगतों. ज्यांना हिंदुधर्माविषयीं आत्मयिता वाटते, हिंदुधर्माविषयीं जिव्हाळा वाटतो त्यांना त्या महत्त्वपूर्ण वाटतील. तुम्ही त्यांतच मोडतां असें मी धरून चालतों.

आध्यात्मप्रगतीला आज समाजांत कोणी विचारीत नाहीं. आध्यात्म-प्रगतींत खरा थोरपणा आहे असें आज फारसें कोणाला वाटत नाहीं. एकाद्या माणसाला स्वतःची आध्यात्मिक प्रगति करण्याची इच्छा झाली तर आजच्या कालमानानुसार त्याला मार्गदर्शक अशी बुद्धिमान् माणसें हिंदुस्थानांत मिळत नाहींत. आजच्या परिस्थितींत त्या मार्गानें कसें पुढें जावयाचें तें हिंदुधर्मांत स्पष्ट नाहीं. तो उत्क्रान्तिमार्ग हिंदु-धर्मांत दिलेला आहे. पण तो समजण्यास दुर्बोध आहे. उदाहरणार्थ तुरीयातीतोपनिषदांत त्याचे चार टप्पे दिलेले आहेत; पण संन्यासो-पनिषदांत (श्लो. ५९)[1] व नारदपरिव्राजकोपनिषदांत (पंचमोपदेश) त्यावर सहा टप्पे असतात असें सांगितलेलें आहे. तसेंच इतर कित्येक बाबतींत या वर्णनांत एकवाक्यता नाहीं. तुटपुंजी माहिती नमूद असल्याचा हा परिणाम आहे. साधनचतुष्टयानें या मार्गावर जातां येतें असें हिंदुधर्माचें म्हणणें आहे. साधनचतुष्टयांपैकीं पहिलें साधन विवेक होय. विवेक म्हणजे नित्य व अनित्य यांमधील भेद असें ग्रंथ सांगतात. पण हल्लींच्या काळीं नित्य व अनित्य यांमधील विवेक करावयाचा म्हणजे

---

१. उदाहरणार्थ संन्यासोपनिषदांत (५९) 'आतुरकुटीचकयोः भूलोकः भुवर्लोकः' तर नारदपरिव्राजकोपनिषदांत 'आतुरकुटीचकयोः भूलोकः' असा व्यवहारक्षेत्रांचा फरक दिसून येतो.

काय करावयाचें ? सांप्रत काळीं पुण्यास राहणाऱ्या व रोज बसमधून नोकरीवर जाणाऱ्या एकाद्या संसारी पण ध्येयनिष्ठ माणसाला जर हिंदु-धर्मांतील खोल भाग समजण्यासाठीं या मार्गानें जाण्याची इच्छा झाली, तर त्यानें नित्य आणि अनित्य याचा विवेक करावयाचा म्हणजे आपल्या जीवनांत काय करावयाचे ? ज्याला हिंदुधर्मांतील उथळपाणी पुरेसें वाटतें त्याला हा प्रश्न नडत नाहीं. पण ज्याला खरोखरी हिंदु-धर्माच्या खोल पाण्यांत शिरावयाचें आहे त्याला सध्यांची माहिती पुरेशी वाटणार नाहीं; इतकेंच नव्हे तर ती त्याचा घोंटाळाही करील.

थिऑसफींत याबद्दलची जास्त व व्यवस्थित माहिती आहे. या मार्गावरचे जे अधिकारी पुरुष आज विद्यमान आहेत त्यांचेकडून ती मिळविलेली आहे. ती आजच्या काळीं माणसाला मार्गदर्शक होईल अशा प्रकारची आहे. साधनचतुष्टयानें साध्य होणारा हा पुरातनकाळचा मार्ग आजही अस्तित्वांत आहे. तो ज्यांचा चालून संपला आहे अशीं अधिकारी माणसें सध्यांही विद्यमान आहेत व त्यांचेकडून ही माहिती मिळवून थिऑसफीनें ती जगासमोर ठेविली आहे. त्या माहितीनें हिंदु-धर्मांतील ग्रंथांवर नवा प्रकाश पडत आहे. ज्याला आज या मार्गानें जाण्याची इच्छा असेल त्याला ती माहिती अत्यंत उपयुक्त होण्यासारखी आहे.

**प्रश्न**—ज्यांचा उत्क्रांति मार्ग चालून संपलेला आहे अशीं माणसें आज पृथ्वीवर विद्यमान आहेत असें थिऑसफीचें म्हणणें आहे का ?

**उत्तर**—होय, तसें थिऑसफीचें म्हणणें आहे. हिंदुधर्माचेंही तेंच म्हणणें आहे. आज हिंदुधर्मीयांचा त्या गोष्टीवर विश्वास नसला तरी मानवी उत्क्रान्ति संपविलेले पुरुष आजही पृथ्वीवर आहेत असें हिंदु-धर्माचें सांगणें आहे. कांहीं पुरुष चिरंजीव असतात, मनु हा एक अधिकारी पुरुष असून तो एक मन्वंतरभर अधिकार चालवीत असतो.

हल्लींचा मनु वैवस्वत आहे, वगैरे गोष्टी हिंदु धर्मांत आहेत.[१] असे पुरुष अस्तित्वांत आहेत असें मानणें हें युक्तिवादासही धरून आहे. आज उत्क्रांतिमार्गावरील सर्व टप्प्यांवरची माणसें जर जगांत दिसून येत आहेत तर शेवटच्या टप्प्यावरचीं माणसें मात्र अस्तित्वांत नाहींत असें म्हणणें समंजसपणाचें होणार नाहीं.

असल्या श्रीकृष्ण बुद्धांसारख्या ज्ञानी पुरुषांची पृथ्वीवर एक संस्था असून मानवी उत्क्रांतीचीं सूत्रें ते चालवींत असतात असें थिऑसफीचें सांगणें आहे. हिंदुलोकांस हें मत आज जरी मान्य नसलें तरी तो विचार हिंदुधर्मांत समाविष्ट आहे. चांगल्या लोकांचें संरक्षण करणें, वाईट लोकांचा नाश करणें व धर्माची जगांत स्थापना करणें हीं कामें करण्याकरितां श्रीकृष्णासारखे पुरुष मधूनमधून जगांत येतात असें भगवद्गीता शिकविते; रावणासारखे खलपुरुष पृथ्वीला भलत्या मार्गानें नेऊं लागले म्हणजे त्याला पायबंद घालण्यासाठीं श्रीविष्णु एक योजना आंखतात व ती योजना तडीस नेण्यासाठीं कित्येक थोर जीवात्मे विशिष्ट ठिकाणीं

---

१. शंकराचार्यांच्या विवेकचूडामणींत 'शांता महान्तो निवसन्ति संतः। वसन्तवल्लोकहितं चरन्तः।' (४०) असें म्हटलें आहे. श्रीमत् भागवतांत 'एते परे च सिद्धेशाश्चरन्ति ज्ञानहेतवः।' (६, १५, १५) व 'देवापिः शन्तनोर्भ्राता मरुश्चेक्ष्वाकुवंशजः। कलापग्राममासाते महायोग बलान्वितौ॥', हीं वचनें आहेत. पृथ्वीवर असे ज्ञानी पुरुष सध्यांही आहेत हें या वचनांवरून उघड आहे.

सध्यां पृथ्वीवर असले ऋषितुल्य पुरुष असल्याचा पुष्कळ पुरावा थिऑसफींत आहे. हे पुरुष पुष्कळांना भेटलेले आहेत. कित्येक लोकांना त्यांनीं लिहिलेलीं पत्रें उपलब्ध आहेत. (पहा जिनराजदास कृत Letters from the Masters of Wisdom) दोन जीवन्मुक्त पुरुषांनीं हिंदी राष्ट्रीय सभेचे जनक मि. ह्यूम यांस अनेक पत्रें लिहिलेलीं होतीं. तीं सध्यां ब्रिटिश म्यूझियम-मध्यें असून Mahatma Letters नामक पुस्तकांत A. T. Barker या लेखकानें प्रसिद्ध केलेलीं आहेत. जास्त पुरावा दाखल करण्यास येथें स्थळ नाहीं.

जन्म घेऊन येतात; भारतीय युद्धांत कौरवांकडचे योद्धे नामोहरम होतील हें असल्या एका योजनेंत अगोदर ठरलेलें होतें, वगैरे गोष्टी हिंदुधर्मांत सांगितलेल्या आहेत. मानवी इतिहासाच्या पाठीशीं कांहीं ज्ञानी असे सूत्रधार असून त्यांची संस्था मानवी उत्क्रान्तीच्या योजना आंखते व त्या तडीस नेते ही गोष्ट वरील वर्णनें सुचवीत आहेत.

खरोखरीच आज अशी एक संस्था आपल्या पृथ्वीवर कार्य करीत आहे.[1] तींत फक्त श्रीकृष्ण-बुद्धांसारखीं आदर्श मनुष्यें आहेत. अर्थात् असल्या माणसांनीं आंखलेली मानवी उत्क्रांतीची योजना अत्यंत शहाणपणाची व न्याय्य असणार. बुद्बळांचा डाव खेळणारा माणूस पटावरील प्यादीं युक्तीनें पुढेंमागें हलवून जसा डाव जिंकतो, तद्वत् ही संस्था जगांतील पुढारी माणसांना इतिहासाच्या रंगभूमीवर पुढेंमागें सारून आपली योजना तडीस नेत असते. जगांतील पुढाऱ्यांना ही योजना समजून घेण्याची इच्छा नसते, व जरी ती त्यांना समजली तरी स्वतःच्या मनांतील आग्रह बाजूस ठेऊन ती तडीस नेण्यास ते तयार नसतात. म्हणून ही संस्था त्या पुढाऱ्यांना उत्तेजन देऊन वा पायबंद घालून, वर चढवून अथवा खालीं आढून आपली योजना तडीस नेत असते. या संस्थेंतील अधिकारी पुरुषांना आपली योजना इतरांस सांगून त्यांच्याकडून ती योजना सुबुद्धपणें तडीस नेण्याची

---

१. ही संस्था व तिचें कार्य यांची माहिती हिंदु धर्मांत सुस्पष्टपणें दिलेली नाहीं. थिऑसफींत पुष्कळच अधिक माहिती दिलेली आहे. त्या माहितीवरून या संस्थेच्या कार्याविषयीं माणसाला जास्त कल्पना येते. तसेंच या संस्थेंतील अधिकाऱ्यांशीं आपणांला शिष्यत्वाचे संबंध जोडावयाचे असले तर कोणत्या मार्गानें गेलें पाहिजे ह्याची माहितीही थिऑसफींत आहे (पहा The Masters & the Path; The Path of Discipleship., Initiation or the Perfecting of Man; The Masters व मराठींतील ‘ सिद्धपुरुष व त्यांचा संप्रदाय ’)

इच्छा असते. पण अशीं माणसें बहुधा त्यांना मिळत नाहींत; कारण जगांतील पुढारी लोक सामान्यतः धर्माभिमान, देशाभिमान, अस्मिता, लोकेषणा, स्वार्थ वगैरेंनीं ग्रासलेले असल्यामुळें न्यायावर आधारलेल्या दूरदृष्टीच्या निःपक्षपती योजनांना ते पाठिंबा देत नाहींत. मी तुम्हांस नुकताच आध्यात्मप्रगतीचा एक मार्ग सांगितला आहे. त्या मार्गानें जीं माणसें जाण्याचा उद्योग करतात तीं या संस्थेंतील अधिकाऱ्यांशीं आपले शिष्यत्वाचे संबंध जोडूं शकतात आणि असल्या शिष्यांस ते आपली योजना दाखवून त्यांच्याकडून सुबुद्धपणाचें सहकार्य मिळवितात.[1]

आज जगांत सर्वत्र जुनें मोडत आहे व लवकरच नवें घडावयाचें आहे. गेल्या पन्नास वर्षांत दोन जागतिक महायुद्धें झालीं व यूनो-सारख्या संस्था अस्तित्वांत आल्या. हिंदुस्थानसारख्या विस्तीर्ण देशाला रक्ताचा एक थेंबही न सांडतां राजकीय स्वातंत्र्य मिळालें आणि तो देश खुषीनें ब्रिटिश राजकुलांत गेला. लढाई बंद झाली पाहिजे,

---

१. हिंदुधर्माच्या वाङ्मयांत मनु, व्यास व सप्तर्षि यांची कांहीं माहिती आहे. हे पुरुष व त्यांचीं कार्यक्षेत्रें, यांची अधिक माहिती थिऑसफींत आहे. वरील संस्था एकूण एक सर्व मानवी क्षेत्रांत काम करीत असते. आपल्या धर्मग्रंथांत न उल्लेखिलेलीं क्षेत्रें व त्यावरील अधिकारी यांचीही बरीच माहिती थिआसफींत आहे. सद्गुरु हा मोक्षदाता गुरु असतो असें दासबोधांत (दशक ५ समास २) म्हटलें आहे. पण गुरु मोक्ष देतो असें सांगितल्यानें या विषयाचा खुलासा होत नाहीं. हा मुमुक्षुमार्ग, त्यावरील टप्पे व सद्गुरु शिष्याकरितां काय काय करतात याचा तपशील थिऑसफींत अधिक आहे. तसेंच ज्ञान, भक्ति, कर्म या तीन मार्गांचें हिंदुधर्मांत वर्णन आहे. पण कला ही कोणत्या मार्गांत येते त्याचा खुलासा नाहीं. कलेंतील सौंदर्योपासना शुद्धमनानें व ध्येयनिष्ठपणानें माणसानें केली तर तोही परमपदास जातो असें थिऑसफीचें सांगणें आहे. थिऑसफींत माणसांच्या मनोरचनांचें जास्त शास्त्रीय वर्गीकरण केलें असून प्रत्येक मनोरचनेस **ray** असें नांव दिलेलें आहे, आणि प्रत्येकाच्या मुमुक्षुमार्गाचें वैशिष्ट्य जास्त स्पष्ट केलेलें आहे. ह्या छोट्या पुस्तकांत त्या गोष्टी वर्णन करण्यास स्थळ नाहीं.

प्रत्येक देश स्वतंत्र असला पाहिजे, जगांतील दारिद्र्य नष्ट केलें पाहिजे, या विचारांचा पगडा आज जनमनावर अधिकाधिक बसत आहे. जुनें युग मावळत असण्याचीं व नवीन युग उजाडत असण्याचीं हीं चिन्हें आहेत. या सर्व घटनांच्या पाठीमागें वरील ऋषिसंघानें आंखलेली एक योजना आहे. त्या योजनेची माहिती थिऑसफिकल सोसायटीनें १९०९ सालीं प्रथम जगासमोर ठेविली आहे.[1] ऋषिसंघ ही कोणत्या प्रकारची संस्था आहे, तींत कोण अधिकारी आहेत, त्या अधिकाऱ्यांशीं आपणाला शिष्यत्वाचा संबंध जोडावयाचा असला तर आपण काय केलें पाहिजे, ऋषिसंघानें आंखलेल्या प्रस्तुत काळच्या योजनेला पाठिंबा द्यावयाचा असला तर आज आपण कोणत्या धोरणानें वागलें पाहिजे, सार्वजनिक जीवनांत कोणत्या गोष्टी त्या योजनेला अनुकूल आहेत आणि कोणत्या प्रतिकूल आहेत वगैरे पुष्कळ नवीन माहिती थिऑसफींत दिलेली आहे. आजच्या सर्वभर घोटाळा माजलेल्या जगांत ती प्रत्येकाला मार्गदर्शक होण्याजोगी आहे. जुन्या काळचा हिंदुधर्म कितीही चांगला व उदार असो, आजचा हिंदुधर्म आजच्या काळाचा व भावी युगाचा विचार करीत नाहीं. तो विचार करणें आज अत्यवश्य आहे. त्यासाठीं सर्व विचारी हिंदूंनीं आपल्या हिंदुधर्माला थिऑसफीची जोड दिली पाहिजे असें मला वाटतें.

---

१. डॉ. बेझंटकृत The Changing World (१९०९) यांत ती माहिती प्रथम सार्वजनिक रीतीनें जगासमोर ठेवण्यांत आली.

# अदृश्य सृष्टीच्या संशोधनाच्या पद्धति

अदृश्य सृष्टीच्या संशोधनांत डॉ. बेझंट या प्रवीण होत्या. त्यांनीं Investigations into the Superphysical नामक निबंधांत ( Adyar pamphlet No. 36 ) कांहीं तद्विषयक उपयुक्त माहिती दिली आहे. तिचा सारांश असा :—

कोणत्या सिद्धींचा उपयोग केला आहे याचा विचार करून अदृश्य सृष्टीच्या संशोधनाची वर्गवारी लावतां येते. वासना देह, मनोदेह, कारणदेह, बुद्धितत्त्वदेह, ( आनंदमय कोषाचा कनिष्ठ भाग ) व आत्मतत्त्वदेह ( आनंदमय कोषाचा वरिष्ठ भाग ) यांच्यापैकीं जरूर त्या उपाधींचा उपयोग करून तद्द्वारां योग्याची जाणीव हें संशोधन करूं शकते. भुवर्लोक व स्वर्गलोक यांतील गोष्टींचें संशोधन करावयाचें असेल, त्या भूमिकांवरील रहिवासी, नरक, स्वर्ग यांतील रहिवाशांची स्थिति, वासनाचित्रें–विचारचित्रें–सूक्ष्मकोषाचे खालच्या दर्जाचे भाग वगैरेंचें संशोधन करावयाचें असेल, तर जरूरीप्रमाणें वासनादेह व मनोदेह यांचा उपयोग करावा लागतो. संशोधकाचा फक्त वासनादेह कार्यक्षम असल्यास भुवर्लोकांतल्याच गोष्टी त्याच्या टप्प्यांत येतात, जास्तीं कांहीं येत नाहीं. जर 'मायावीरूपा'चा उपयोग करण्याचें सामर्थ्य त्याला असेल, म्हणजे स्वतःच्या मनोदेहास कृत्रिम वासनादेह संलग्न करण्याचें सामर्थ्य असेल, तर स्वर्लोकांतील दृष्टि व भुवर्लोकांतील जरुर ती दृष्टि त्याला उपयोगांत आणतां येईल. पूर्वकालीन गोष्टी तपासावयाच्या असल्या तर कारणदेहाचा उपयोग करावा लागतो. जरी भुवर्लोकांत व कनिष्ठ स्वर्गलोकांत पूर्वजन्मींचीं दृश्यें दिसत असलीं तरी तीं अधूनमधून घडलेल्या गोष्टींची असतात; तेव्हां जर पूर्वकालचें सुसंगत ज्ञान हवें असेल तर त्यासाठीं कारणदेह उपयोगांत आणावा लागतो. त्या उपाधीच्या सहाय्यानें भूतकालचें सुव्यवस्थित दृश्य पाहातां येऊन हव्या त्या तपशीलाचें निरीक्षण करतां येतें. त्या दृश्यांत पूर्वकालीन इतिहासाचा समग्र व उत्कृष्ट चित्रपट समाविष्ट असतो, व तो सावकाशीनें अथवा जलद हवा तसा उलगडून पहातां येतो; पुनः पुनःही पहातां येतो. त्यांतील दृष्टीला इतरांचें फक्त कारणदेह दिसतात असें नाहीं. जर संशोधक आपलें काम नीट जाणत असेल तर त्याला खालच्या भूमिकांवरील सर्व दृश्यांचा त्यांत समावेश करतां येतो. आपल्या ग्रहमंडळांतील इतर गोलांचें संशोधन व पूर्वीच्या उत्क्रान्ति–प्रदक्षिणांचें संशोधन बुद्धितत्त्वदेहानें करावें लागतें. इतर ग्रहमंडळाच्या संशोधनास आत्मतत्त्वदेह जरूर पडतो. या उच्च प्रकारच्या सिद्धींनीं जें दिसतें तें संदिग्ध नसतें. तें इतकें सुस्पष्ट व रेखीव दिसतें कीं तें शब्दांनीं सांगतां येणार नाहीं !

शास्त्रज्ञ जसें दृश्यसृष्टीचें संशोधन करतात तद्वत् थिऑसफीनें अदृश्यसृष्टीचें संशोधन केलेलें आहे व त्या आधारावर धर्माची एक नवीन मांडणी जनतेसमोर ठेविली आहे. ही मांडणी प्रत्येकाच्या मनांत स्वतःच्या धर्माबद्दल आदर निर्माण करून त्यांतील रहस्य स्पष्ट करते व त्याबरोबरच जगांतील इतर धर्मांबद्दल सहानुभूति निर्माण करते. ती मांडणी अनेक प्रश्नांस समर्पक उत्तरेंही देते. मृत्यु म्हणजे काय ? मृत्यूनंतर जीव शाबूद रहातो का ? माणसाला एक जन्म असतो कीं अनेक असतात ? माणसाची उत्क्रान्ति कशी होते ? ईश्वर आहे का ? मानवी इतिहासाच्या पाठीशीं कोणी सूत्रधार आहेत का ? जगाची नवीन घडी कशी बसवितां येईल ? असल्या प्रश्नांस थिऑसफींत नवीन रीतीचीं व समर्पक उत्तरें देण्यांत येत असतात.

बंधुत्वाची आवड असणाऱ्या कोणत्याही जिज्ञासूला थिऑसफिकल सोसायटीचा सभासद होतां येते. थि. सोसायटींत संपूर्ण मतस्वातंत्र्य आहे. थिऑसफीच्या अमुक एका सिद्धान्तावर सभासदानें श्रद्धा ठेवली पाहिजे असा कोणताही निर्बंध नाहीं. अभ्यास करून सभासदांनीं आपलीं मतें बनवावीं असें सोसायटीचें सभासदांना सांगणें आहे. यावरून दिसून येईल कीं **थिऑसफिकल सोसायटी किंवा थिऑसफी ह्यांना पंथ असें म्हणतां येणार नाहीं.** ही सोसायटी नुसती तात्विक चर्चा करण्यासाठीं काढलेली नाहीं. स्वतःला आणि जगाला सुधारण्यासाठीं, सर्वांना समजूतदार व कर्तव्यदक्ष करण्यासाठीं, जगांतील दुःख कमी व्हावें एतदर्थ नाना उद्योग करण्यासाठीं ती स्थापिलेली आहे.

थिऑसफिकल सोसायटीची घटना लोकशाहीस धरून आहे. तिचे सध्यांचे लोकनियुक्त अध्यक्ष श्री. एन्. श्रीराम हे आहेत. तिचें आंतरराष्ट्रीय मुख्य पीठ मद्रासनजीक अड्यार येथें आहे. हिंदुस्थानांतील मराठीच्या प्रान्तांत तिच्या पंधरा शाखा असून त्या शाखांस संघटित करणाऱ्या संस्थेस मराठी थिऑसफिकल फेडरेशन म्हणतात. तिचे सध्यांचे अध्यक्ष श्री. राजाराम सखाराम भागवत एम्. ए. पोलिस लाईनजवळ, ठाणें, हे आहेत. चिटणीस श्री. गंगाधर रघुनाथ भडमडे बी. ए., एलूएल्. बी., १८ गणेशवाडी पुणें ४, व श्री. गोपाळ हरी कुंटे बी. एस्सी, सेवानिवृत्त प्राध्यापक, ७८१ रविवार नाशिक हे आहेत. त्यांचेपैकीं कोणाही-कडून जास्त माहिती जिज्ञासूंस मिळूं शकेल.

## मराठी थिऑसफिकल फेडरेशननें प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें

| | रु. आ. पै. |
|---|---|
| (१) **थिऑसफीवरील सुबोध व्याख्यानें** भाषांतरकार दे. भा लेले, बी. ए. | ०—६—० |
| (२) **सिद्धपुरुष व त्यांचा संप्रदाय** लेखक वा. ल. चिपळूणकर व रा. स. भागवत | ०—१४—० |
| (३) **हिंदु सामुदायिक पूजा** (भारत-समाज-रचित) ले. रा. स. भागवत एम्. ए. (ठाणें) | ०—६—० |
| (४) **महम्मद पैगंबर व त्यांचा इस्लामधर्म** ले. वा. ल. चिपळूणकर | ०—४—० |
| (५) **मृत्यूनंतर काय?** (दोन जिज्ञासूंचा संवाद) ले. रा. स. भागवत. एम्. ए. | ०—४—० |
| (६) **ईश्वर आहे काय?** (दोन जिज्ञासूंमधील संवाद)-ले. रा. स. भागवत | ०—४—० |
| (७) **थिऑसफी म्हणजे काय?** ले. रा. स. भागवत, एम्. ए. | ०—४—० |
| (८) **साधनचतुष्टय** — "कृष्णजी" कृत "At the Feet of the Master" चें मराठी भाषांतर | ०—८—० |
| (९) **जीवनाचा हेतु**—लेखक वा. ल. चिपळूणकर | ०—६—० |

वर दिलेलीं मराठी थिऑसफिकल फेडरेशननें प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें खालील पत्त्यावर चौकशी केल्यास मिळूं शकतील. (१) श्री. द. म. गावंड. खारकर आळी, ठाणें, जिल्हा ठाणें; (२) श्री. म. शि. नाटके, हिरा महाल, पहिला मजला, वडाळा रोड स्टेशनसमोर, माटुंगा-मुंबई १९.

---

| | |
|---|---|
| **वेझंट-चरित्र**—आवृत्ति २ री (१९४७) ले. रा. स. भागवत. प्रकाशक: महाराष्ट्र ग्रंथभांडार, लि. मुंबई ४. | ५—०—० |
| **राजयोगाचीं मूलतत्त्वें व अभ्यास**-ले. रा. स. भागवत एम्. ए. प्र. महाराष्ट्र ग्रंथभांडार, लि. मुंबई ४ | ३—०—० |
| **जीवन आणि कला**-श्री. जिनराजदास (माजी अध्यक्ष थि. सोसायटी) यांच्या लेखांचा अनुवाद; ले.-दे. भा. लेले; प्र. महाराष्ट्र ग्रंथ भांडार, लि. मुंबई ४. | ३—०—० |
| **मृत्यु व मृत्यूनंतर**-ले. रा. स. भागवत, एम्. ए., प्र. अ. अं. कुळकर्णी, कॉंटिनेंटल प्रकाशन, टिळक रोड, पुणें २. | १—८—० |